शासनाच्या विविध योजने अंतर्गत नोंद झालेल्या सापळा गुन्हंयाची योजनानिहाय प्रकरणांची माहिती.

## शालेय पोषण आहार योजना

| अ.क्र | परिक्षेत्राचे नाव व गुरनं व मुख्यालय सिआर क्रमांक | लोकसेवकाचे नांव, हुददा् व खाते | वर्ग | लाचेची रक्कम | कल्याणकारी योजनेचे नांव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. लातूर ग्रामिण गु.र.नं. ३००४/१४ कलम ७, १३(१)(ड) सह १३(२)भ्र.प्र.अ. १९८८ दा. दिनांक ११/०२/२०१४ सिआर/१२२/लातुर/२०१४ | श्रीमती शोभा पिता रघुनाथसिंह बायस वय ४९ वर्ष व्यवसाय मुख्याध्यापिका, महानगर पालिका शाळा क्रमांक ६ शंकरपुरमनगर, कव्हा रोड लातूर तालुका व जिल्हा लातूर | ३ | १५००/- | शालेय पोषण आहार योजना | तक्रारदार यांनी शालेय पोषण आहार अंतर्गत अन्न शिजवुन दिले त्या आहाराचे खर्चाचे देयक वेळोवेळी पंचायत समिती लातूर येथे सादर केले त्या कामाचेबक्षीस म्हणुन आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना १५००/- रु. लाचेची मागणी करुन लाच स्वीकारले आहे. |
| २ | पुणे परिक्षेत्र, सांगली ॲ.कॅ. विश्रामबाग पोलीस ठाणे, जि. सांगली, भाग-६, गु.र.नं. ४५२/२०१५, ला.प्र.का.कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) दि.०४/०९/१५ (सीआर/८५५/सांगली/१५) | गणेश राजाराम चोरमुले, वय-५२ वर्षे, परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, प्रशासकीय इमारत, सांगली ( महिला व बाल विकास विभाग ) | ३ | रुपये १५००/- | बाल संगोपन योजना | तक्रारदार यांचे बाल संगोपन योजनेच्या अनुदानाचे चेक देण्याकरीता आलोसे यांनी १,५००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| ३ | अमरावती परिक्षेत्र, अमरवती ॲ.कॅ.ब्युरो, पो.स्टे.राजापेठ, अमरावती (शहर) अप.नं. ३१७६/२०१५ कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) ला.प्र.का.१९८८ दि.२७/११/१५ | सौ.विना साहेबराव लव्हाळे, वय ५३ वर्षे, मुख्याध्यापिका, म.न.पा.उच्च प्राथमिक मराठी शाळा, जेवडनगर, अमरावती, रा. प्रशांतनगर, पवन मेडीकलजवळ, किशोरनगर, अमरावती (सीआर/१११६/ अमरावती/२०१५) | ३ | रुपये २०००/- | शालेय पोषण आहार योजना | तक्रारकर्ता सचिव असलेल्या जय माता दी नावाचे बचत गटाकडुन म.न.पा.प्राथमिक शाळा, जेवडनगर, अमरावती येथील शालेय पोषण आहार मध्यान्ह भोजन योजनेच्या चेक मंजुर झाला होता. सदर चेक देण्याचे मोबदल्यात सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे यांना २००० रु. लाच रक्कम स्विकारल्यानंतर रंगेहाथ पकडण्यात आले. |
| ४ | नाशिक परिक्षेत्र, नाशिक ॲ.क. ब्युरो,, घोटी पोलीस ठाणे, गुरनं. ३०८६/२०१५ , भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८चे कलम७, १३(१)(ड) सह १३(२)प्रमाणे दिनांक १६/१२/२०१५ | चंद्रकांत दाजी गांगूर्डे, वय ४४, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा, पिंपळगांव मोर ता.इगतपुरी जि. नाशिक ( जिल्हा परिषद ) ( सीआर/११७५/नाशिक/२०१५) | ३ | रुपये ३०००/- | शालेय पोषण आहार योजना | तक्रारदार हया जिजामाता महिला बचत गटाच्या अध्यक्षा आहेत. त्यांना ग्रामपंचायत, पिंपळगांव मोर यांनी ठराव करुन जिल्हा परिषद शाळा, पिंपळगांव मोर या शाळेतील मुलांना शालेय पोषण आहार पुरवण्याचे काम दिले होते. त्याप्रमाणे त्यां जिल्हा परिषद शाळा, पिंपळगांव मोर येथील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरवित आहेत. त्यांनी पुरविलेल्या शालेय पोषण आहाराचे १०,०००/- रुपये बिल झाले होते. सदरचे बिल त्यांना मंजूर झाले असून त्या रक्कमेचा चेक त्यांना प्राप्त झाला होता. त्यांना त्यांचे बिलाचा चेक मिळाल्याबद्यल शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत दाजी गांगूर्डे यांनी त्यांचेकडे ३०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | नाशिक परिक्षेत्र, नंदुरबार अॅ.कॅ. ब्युरो नवापूर पोलीस ठाणे गुरनं. ३००९/२०१६ , भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक ०२/०३/२०१६ | रश्मी सुधाकर सोनार, वय २६, मुख्याध्यापिका व गृहपाल, कस्तूरबा गांधी निवासी शाळा व विद्यालय, वाकीपाडा ता.नवापूर जि.नंदूरबार ( शिक्षण विभाग ) ( सीआर/२८४/नदुरबार /२०१६) | ३ | १४,०००/- रुपये | शालेय पोषण आहार योजना | तक्रारदार यांची मावशी हया कस्तूरबा गांधी निवासी शाळा व विद्यालयास सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळेस ( वस्तगृहास ) भाजीपाला पुरवितात. त्यांचे माहे सप्टेंबर २०१४ ते डिसेंबर २०१५ या कालावधीत पुरविलेल्या भाजीपाल्याचे बिल ९३,०५३/- रुपये झाले होते. सदरचे बिल मंजूर झाल्याने तक्रारदार यांच्या मावशी हया चेक घेण्यासाठी मुख्याध्यापिका सोनार यांचेकडे गेल्या असता चेक देण्याचे बदल्यात टक्केवारीप्रमाणे मुख्याध्यापिका सोनार यांनी त्यांचेकडे १४,०००/- रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची मावशी मुकबधिर असल्याने त्यांचेवतील तक्रारदार यांनी तक्रार दिली. त्यानंतर मुख्याध्यापिका सोनार यांनी तक्रारदार यांचेकडे १४,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| ६ | नांदेड परिक्षेत्र, नांदेड अॅ.कॅ. ब्युरो, मांडवी पो ठाणे गरनं ३००३/२०१६ कलम ७ लाप्रका १९८८ दिनांक २०/०४/२०१६ | अविला ज्योतीराम जाधव, वय ५१ वर्ष मुख्याध्यापिका जिल्हा परिषद शाळा ( जिल्हा परिषद विभाग ) ( सीआर/३२९/ नांदेड/२०१६ ) | ३ | १०००/- रुपये लाचेची मागणी | शालेय पोषण आहार योजना | मुळ तक्रारदार यांना शालेय पोषण आहार योजना अंतर्गत खिचडी शिजविल्याचे माहे ऑगष्ट २०१५ ते डिसेंबर २०१५ पर्यंतचे भाजीपाला व ईधन खर्चाची रक्कम दिल्याबददल व सदर कालावधीतील मानधनाची ५०००/-रु. रक्कम त्यांचे बॅंक खात्यावर पाठविल्याबददल बक्षीस म्हणुन पंचासमक्ष १०००/-रु.लाचेची मागणी करुन स्वत: लाच स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन गुन्हा. |
| ७ | नाशिक परिक्षेत्र, जळगाव अॅ.कॅ. ब्युरो, एमआयडीसी जळगांव पोलीस ठाणे गुरनं. ३००७/२०१६ , भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. ०२/०५/१६ | सौ.आशा संजय तेजकर, वय ४८, पर्यवेक्षिका, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, जिल्हा परिषद, जळगांव ( जिल्हा परिषद विभाग ) ( सीआर/३६८/ जळगाव/२०१६ ) | ३ | ३६,२००/- रुपये | शालेय पोषण आहार योजना | तक्रारदार यांच्या बचत गटाने एकात्मीक बाल विकास सेवा योजना अंतर्गत जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेल्या ६ अंगणवाडयांना पुरक पोषण आहार पुरविलेला आहे. मागील ८ महिन्यात पुरविलेल्या आहाराचे बिल रक्कम रुपये १,७७,०००/- रुपये मंजूरीचा चेक देण्यासाठी आलोसे तेजकर यांनी तक्रारदार यांचेकडे बिलाचे टक्केवारीप्रमाणे ३२,५००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| ८ | नाशिक परिक्षेत्र, नंद्रबार अॅ.क. ब्युरो, शहादा पोलीस ठाणे गुरनं. १५७/२०१७, कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ दिनांक - १०/०४/०२१७ | सोमनाथ काशिनाथ महाजन, वय २९, कनिष्ठ सहाय्यक, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय, तोरणमाळ, ता. धडगाव, जि. नंदुरबार (महिला व बाल विकास- वर्ग ३) (सीआर/१९३/नंदरबार/२०१७) | ३ | ३०००/- रुपये | | नवदुर्गा बचत गटाचे अंगणवाडी पोषण आहाराचे मोखाचापाडा आणि सावलीपाडा येथे अनुक्रमे एप्रिल २०१६ व जुलै २०१६ पासुनचे प्रलंबित बिल काढुन देण्यासाठी आलोसे यांनी ३०००/- रुपये लाचेची मागणी करून स्विकारली. |
| ९ | औरंगाबाद परिक्षेत्र, उस्मानाबाद अॅ. क. ब्युरो., पोस्टे बेंबळी गुरन ९६/२०१८ कलम ७,१२, १३(१)(ड) सह १३ (२) ला.प्र. का १९८८ दिनांक - २५/०६/२०१८ | १)सौ.शोभा सुधीर गायकवाड, वय ३३ वर्ष, अध्यक्षा शोलय व्यवस्थापन समिती जि.प. कन्या प्रशाला बेंबळी | ईलोसे | १०,०००/- रुपये | शालेय पोषण आहार योजना | तक्रारदार यांनी शालेय पोषण आहार योजने अंतर्गत सन २०१८ -२०१९ वर्षाकरीता आहार शिजवुन देण्याचे काम मिळणेकरीता शालेय व्यवस्थापन समितीकडे करार नामा सादर केला असता शोलय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आरोपी क्र. १ व त्यांचे पती आरोपी क्र. २ यांनी २००००/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडअंती १५०००/- रु. ठरवुन |
| | | २)सुधीर गणपतराव गायकवाड वय ३८ वर्ष रा. बेंबळी | खाजगी इसम | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३)तुकाराम भिमाशंकर उंबरे, वय ३२ वर्ष रा. बेंबळी ता.जि. उस्मानाबाद (शिक्षण विभाग) (सीआर/४२१/उस्मानाबाद/२०१८) | खाजगी इसम | | | १००००/-रु. आरोपी क्र. ३ यांच्या मार्फतीने स्विकारली. |
| १० | औरंगाबाद परिक्षेत्र, उस्मानाबाद ॲ.क. ब्युरो., पोस्टे आनंदनगर, जि उस्मानाबाद गुरन २७६/२०१८ क ७ भ्र. प्रतिबंधक (सुधारणा) अधिनियम २०१८ दिनांक - ३१/०८/२०१८ | १)गोवर्धन निळकंठराव लांडगे, वय ५६ वर्ष सहा. प्रशासन अधिकारी | ३ | ६३,५००/- रुपये | पोषण आहार योजना | तक्रारदार यांच्या पत्नीचे बचत गटा मार्फत घरपोच पोषण आहार योजने अंतर्गत लाभार्थी यांना अंगणवाडी मार्फत खाद्य पुरविण्याचे बिल काढणेसाठी व सदर योजनेसाठी प्रलंबीत गहु मिळणेसाठी पत्र व्यवहाराची कारवाई करणेसाठी तसेच सभापती यांनी पोषण आहाराचे घेतलेले नमुने यावर कार्यवाही होवु नये यासाठी मदत करणेसाठी आलोसे यांनी ६३५००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारलेली आहे. |
| | | २)उमेश भगवानराव पवार, वय ४० वर्ष वरिष्ठ सहा. दोघे नेमणुक महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद (जिल्हा परिषद) (सीआर/५७५/उस्मानाबाद/२०१८) | ३ | | | |
| ११ | अमरावती परिक्षेत्र, यवतमाळ ॲ.क.ब्युरो, पो.स्टे. अवधुतवाडी जि. यवतमाळ, अप.क्र. ३०७/२०१९, कलम ७ ला.प्र.का. २०१८ दिनांक-०६/०३/२०१९ | सौ. सिमा दत्तात्रेय मुक्कावार वय ५० वर्ष पद अंगणवाडी सेविका रा. साईप्रसाद अपार्टमेंन्ट विंग नंबर ३ प्लॅट क्रमांक १० दहिवलकर लेआउट, उमरसरा यवतमाळ (एकात्मीक बालविकास प्रकल्प विकास-ईलोसे) (सीआर/१६९/यवतमाळ/२०१९) | ईलोसे | ५,०००/- रुपये | पोषण आहार योजना | फिर्यादी यांना पोषण आहाराचे बिल देणेकरीता तसेच नविन अकरा महिण्यांचा करार करून देण्याकरीता आलोसे यांनी ५०००/- रुपये लाचेची मागणी करून स्विकारली. |